**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इस्राइलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेत्यान्यू यांच्यासोबत तेल अवीवमध्ये चर्चा

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्घाटन

- राज्यातल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढ, थकबाकीचा पहिला हप्ता पुढच्या महिन्यात मिळणार

- ईडीकडून उद्योजक अनिल अंबानी यांच्या घरावर जप्ती

**आणि**

- बांग्लादेशातल्या महम्मद युनूस यांच्या नेतृत्त्वाखालच्या सरकारच्या काळात गैरप्रकार झाल्याचा बांग्ला देशचे अध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांचा दावा

**<><><><><><>**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इस्राइल दौऱ्यात तेल अवीवमध्ये इस्राइलचे प्रधानमंत्री** बिन्यामीन नेतान्यू यांच्याशी चर्चा केली. दोन्ही देशांमधले संबंध सुदृढ करण्यावर यावेळी चर्चा झाल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात सांगितलं आहे. यावेळी तंत्रज्ञान, जल व्यवस्थापन, कृषी, मनुष्यबळ व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. इस्राइल आणि आसपासाच्या भागातल्या परिस्थितीवरही या भेटीत चर्चा झाल्याचं मोदी म्हणाले. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी जेरुसलेममध्ये दाखल झाले. इथं ते इस्राइलच्या संसदेला संबोधित करणार आहेत.

दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज दुपारी तेल अवीवला पोचल्यावर नेत्यान्यू आणि त्यांच्या पत्नी सारा नेत्यान्यू यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं.

**<><><><><><>**

भारत-इस्त्रायल मुक्त व्यापार कराराबाबत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज नवी दिल्लीत इस्त्रायलच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. या चर्चेत सकारात्मक संवाद झाल्याचं तसंच आर्थिक संबंध दृढ करण्याबाबत त्यांची बांधितली यातून दिसून आल्याचं गोयल यांनी समाजसाध्यमात सांगितलं. व्यापार, नवोन्मेष, आणि वाढीच्या नव्या संधी खुल्या करण्यासाठी दोन्ही बाजूंचा उत्साह यातून वाढल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयुष उपचार पद्धतींना प्रोत्साहन दिल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तसंच पर्यावरण रक्षणालाही हातभार लागतो, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**- - - होल्ड - राष्ट्रपती बाइट - - -**

यावेळी त्यांनी आयुष उपचार पद्धतींचे फायदे आणि त्यांच्या प्रचार प्रसारासाठी सरकारकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी छोट्या छोट्या दुखण्यांसाठी घरगुती उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा तसंच व्यायामाचा सल्ला दिला. आयुष पर्यटनावर भर देण्याची गरज केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केली. या चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. मेळाव्यापूर्वी राष्ट्रपती

मुर्मू यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेतलं. संध्याकाळी राष्ट्रपती नागपूर इथं ब्रह्मकुमारी संस्थेच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

<><><><><>

महाराष्ट्र आत्मविश्वासानं पुढं जात भारताच्या विकास यात्रेचं एक प्रमुख केंद्र बनला आहे, असे प्रशंसोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज काढले. त्या नागपुरात ब्रह्माकुमारीज संस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. महाराष्ट्र देशाच्या प्रगतीला सातत्यानं बळ देत आला आहे. उद्योग, कृषी, उद्योजकता, उच्च शिक्षण आणि अमूल्य सांस्कृतिक परंपरांच्या बळावर महाराष्ट्र पुढं जात आहे. समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचतील, अशा समग्र आणि समावेशक विकासाच्या दिशेनं वाटचाल करणे हे आमचे ध्येय आहे. याच उद्देशानं समृद्ध महाराष्ट्र आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी ब्रह्माकुमारीज संस्थेनं आयोजित केलेले हे अभियान महत्त्वाचं आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

<><><><><>

लोकसभा, विधानसभा तसंच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक नियमावलीत सुसुत्रता आणण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग संयुक्तरित्या प्रयत्न करणार आहेत.  नवी दिल्लीत काल आयोजित केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोग अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेत एकमताने मंजूर झालेल्या ‘राष्ट्रीय घोषणापत्र २०२६’ मध्ये ही घोषणा करण्यात आली आहे. निर्दोष मतदार याद्या म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा आधारस्तंभ असून निवडणुक प्रक्रियेची पारदर्शक आणि कार्यक्षम अंमलबजावणी केल्यामुळे लोकशाही अधिक बळकट होईल असं या घोषणापत्रात नमूद केलं आहे. ईसीआय नेट डिजिटल मंच, ईव्हीएम यंत्र आणि मतदार याद्या इत्यादी निवडणूकसंबंधित प्रक्रिया सर्व राज्यांच्या निवडणूक आयोगांना सामायिकरित्या उपलब्ध करून देणं  संविधान आणि देशाच्या हितासाठी  आवश्यक असल्याचं आयोगांनी म्हटलं आहे.

अशा प्रकारची गोलमेज परिषद २७ वर्षांच्या कालावधीनंतर आयोजित करण्यात आल्याबद्दल सर्व सहभागी अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><><>**

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढ करून ५५ वरून ५८ टक्क्यावर नेण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची घोषणा राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी विधानपरिषदेत केली. याचा फायदा ५ लाख१६ हजार कार्यरत कर्मचाऱ्यांना, तर ८ लाख ७२ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल, अशी माहिती त्यांनी दिली. चालू महिन्यापासून याची अंमलबजावणी सुरू होईल. जुलै ते ऑक्टोबर २०२५ ची थकबाकी गुढीपाडव्यानिमित्त मार्च २०२६ मध्ये दिली जाईल.

**<><><><><><>**

ईडीनं उद्योजक अनिल अंबानी यांच्या मुंबईतल्या घरावर जप्ती आणली. या घराची किंमत सुमारे पावणे ४ हजार कोटी रुपये आहे. रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी ही कारवाई झाली. अनिल अंबानी यांच्या १५ हजार ७०० कोटी रुपयांच्या संपत्तीवर आतापर्यंत जप्ती आली आहे.

**<><><><><><>**

दोन पेक्षा अधिक अपत्य असणाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लढवण्याची संधी देणारी विधेयकं राजस्थानच्या मंत्रिमंडळानं आज मंजूर केली. लोकसंख्या वाढीवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी यापूर्वी हे कायदे करण्यात आले होते, असा दावा राज्याचे संसदीय कामकाज मंत्री जोगाराम पटेल यांनी बातमीदारांशी बोलताना केला. १९९१ ते १९९४ या कालावधीत जन्मदर ३पूर्णांक ६ दशांश होता,तो २ इतका झाल्यावर आता असे उपाय कमी महत्वाचे ठरतात असं ते म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री इ ड्राईव्ह  योजनेअंतर्गत यावर्षी चालू महिन्यापर्यंत २८ लाखाहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची विक्री झाली.केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच डी कुमारस्वामी यांनी आज ही  माहिती दिली. इलेक्ट्रिक वाहनं या विषयावर नवी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.विक्री झालेल्या वाहनांमध्ये २० लाखांहून जास्त  इलेकट्रीक दुचाकी असून सुमारे ३ लाख इलेक्ट्रिक तीनचाकी आहेत.

<><><><><>

बांग्ला देशात मुहम्मद युनुस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या अंतरिम सरकारच्या काळातल्या अनेक गैरप्रकारांना बांग्ला देशचे अध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी वाचा फोडली आहे. एका नियतकालिकाला मुलाखत देताना त्यांनी सांगितलं की, ऑगस्ट २०२४ पासून सुमारे दीड वर्ष त्यांना स्थानबद्ध करुन मानसिक दबावाखाली ठेवलं होतं. देशात आणीबाणी घोषित करण्याची मागणी समाजाच्या विविध घटकांकडून होत होती, मात्र तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांसह अध्यक्षांचाही त्याला विरोध होता. अंतरिम सरकारने अनेक निर्णय संविधानाविरुद्ध घेतले, राष्ट्राध्यक्षांचं खच्चीकरण केलं असा आरोप त्यांनी केला. बांगला देशात लोकशाही मार्गाने सरकार स्थापन झाल्यानंतर आपली घुसमट थांबली असल्याची भावना शहाबुद्दीन यांनी व्यक्त केली. कार्यकाळ २०२८पर्यंत असला तरी नवीन सरकारने सांगितलं तर पायउतार होण्याची तयारी शहाबुद्दीन यांनी दर्शवली.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एटमधे आज कोलंबो इथं न्यूजीलंड आणि श्रीलंका यांचा सामना सुरु आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या १४ षटकात ६ बाद ८८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><><>//